# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हीसेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६(सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (वित्त व लेखा अधिकारी कार्यालय)

महात्मा ज्योतीबा फुले, शैक्षणीक परिसर, अमरावती रोड, नागपूर– ४४००३३.


**क्र. रातुमनावि/लेखा/दान./२०२४/६७४३** **दिनांक: ०४/१२/२०२४**

**प्रति,**

____________________

____________________

____________________

**विषय:– ११२ व्या दीक्षांत समारंभातील सुवर्ण व रौप्य पदके तयार करून घेण्यासाठी दरसुचीत दर्शविल्यानुसार निविदा अर्ज सादर करणेबाबत.**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथील ११२ व्या दीक्षांत समारभांसाठी लागणा–या सुवर्ण व रौप्य पदके तयार करण्याकरीता पंजीबध्द सुवर्णकाराकडून निविदा अर्ज मागविण्यात येत आहे. निविदा अर्ज सोबत जोडलेला अर्ज, अटी शर्थी व दरसुची नुसार स्वीकारण्यात येतील.

| अ. क्र. | पदकाचे विवरण | अंदाजीत किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | सुवर्ण पदके तयार करणे | ११,००,००० | ०५ दिवस |
| २ | रौप्य पदके तयार करणे | | |

**वेळापत्रक**

| अ.क्र | **nagpuruniversity.ac.org**<br>**Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University** | **तारीख व वेळ** |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसारीत करण्याची तारीख | ०४/१२/२०२४ |
| २ | निविदा डाउनलोड करून बीड सादर करण्याची सुरवातीची तारीख | ०४/१२/२०२४ |
| ३ | सिलबंद निविदा अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ | १०/१२/२०२४ वेळ दुपारी २.०० पर्यत |
| ४ | निविदेची प्रत (Hard copy)सादर करण्याची अंतीम तारीख व वेळ | १०/१२/२०२४ वेळ दुपारी २.०० पर्यत. |
| ५ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | १०/१२/२०२४ वेळ दुपारी ३.०० वाजता |

**वित्त व लेखा अधिकारी**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ**

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

## ई–निविदा अर्ज

प्रति,

**उपकुलसचिव (लेखा)**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,
नागपूर.

विषय :– सुवर्ण व रौप्य पदके तयार करून घेणे बाबत निविदा...

संदर्भ :– विद्यापीठाची निविदा अर्ज प्रसारीत क्र. रातुमनावि/लेखा/दान/२०२४/६७४३ दि. ०४/१२/२०२४

महोदय,

मी श्री ———————————————————— संदर्भित निविदा अर्ज वाचला असून त्यात सादर केलेल्या अटी व शर्तीशी पूर्णपणे सहमत आहे. कराराप्रमाणे सुवर्ण व रौप्य पदके तयार करून पुरवठा करण्यास तयार असल्याचे हया सुवर्ण व रौप्य पदके तयार करून निविदा अर्जा व्दारे लिहून देत आहे.

१. अर्जदाराचे संपूर्ण नांव : ————————————————————
२. सार्थाचे नांव व संपूर्ण पत्ता :————————————————————
————————————————————

३. सुवर्णकार व्यवसायाचे नोंदणी प्रमाणपत्र : जोडले आहे / नाही
४. इनकमटॅक्स रिटर्न (मागील ३ वर्षाचे ) : जोडले आहे / नाही
५. G. S. T. नोंदणी क्रमांक, अथवा G. S. T. अंर्तगत सवलत प्राप्त असल्यास त्यासबंधी सक्षम अधिका–याचे प्रमाणपत्र : जोडले आहे / नाही
उपरनिर्दीष्ट सादर केलेली माहिती पूर्णपणे सत्य आहे.

सार्थाचे नांव ————————————————————जी.एस.टी. क्र ——————
संपूर्ण पत्ता ———————————————————— दुरध्वनी क्र.——————
———————————————————— भ्रमन क्र.——————

ठिकाण :

दिनांक :

सही व शिक्का

# निविदा धारकाने द्यावयाचे वचनपत्र

मी ........................................................................घोषित करतो की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने ई–निविदा अर्ज प्रपत्रासोबत सादर केलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तदनुषंगाने ठरवून दिलेल्या अनामत / सुरक्षा रक्कम मा. वित व लेखा अधिकारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचे खात्यात ऑनलाईनने रू.................... दिनांक ..........................रोजी जमा करण्यात आली आहे.

ठिकाण :

दिनांक :

निविदा धारकाची सही ................................................

पूर्ण नांव ...............................................................

संपूर्ण पत्ता .............................................................

..............................................................................

..............................................................................

दुरध्वनी क्र. .........................................................

सेल टॅक्स क्र. ......................................................

...............................................................................................................

## क रा र ना मा

विद्यापीठाने ठरवून दिलेल्या अटी व शर्ती / नियमांचे माझ्याकडून उल्लंघन किंवा विद्यापीठाच्या आदेशाप्रमाणे कोणत्याही बाबतीत आवश्यक ती कार्यवाही विहीत कालावधीत पुर्ण न केल्यास कायदेशीर कार्यवाही घेण्याचा व करारनामा ताबडतोब रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठाला राहील. करारनामा रद्द झाल्यास अनामत / सुरक्षा रक्कमेवर माझा कोणताही अधिकार राहणार नाही असे शपथेवर लिहून देत आहे.

ठिकाण :

करारनामा लिहून देणाराची सही ....................................

दिनांक :

पूर्ण नांव ...........................................................................

साक्षीदार : १) नांव ................................................................ सही .....................................

२) नांव ................................................................ सही .....................................

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

निविदा सूचना क्र. रातुमनावि/लेखा/दान/२०२४/ दिनांकः ०३/१२/२०२४ च्या

## अटी व शर्ती

१ निविदा अर्जाचे विहित प्रारूप ( अटी व शर्तीसह ) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ अधिकृत संकेत स्थळ **nagpuruniversity.ac.org** येथे उपलब्ध आहे.

२. निविदा अर्जाचे व्दि लिफाफा पध्दतीने मागविण्यात येत असून दोन्ही बीड (तांत्रीक व व्यावसायीक ) ऑफ लाईन सादर करावयाच्या आहेत. अपूर्ण निविदा अर्ज विचारात घेता येणार नाही निविदा अर्ज विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे.

३. तांत्रीक बीड (लिफाफा क्र. १) मध्ये खालील कागदपत्रांचा छायांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.
i) सुवर्णकार व्यवसायाचे नोंदणी प्रमाणपत्र ii) इनकमटॅक्स रिटर्न (मागील ३ वर्षाचे ) iii ) G. S. T. नोंदणी क्रमांक अथवा G. S. T. अंर्तगत सवलत प्राप्त असल्यास त्यासबंधी सक्षम अधिका—याचे प्रमाणपत्र iv) पॅनकार्ड

**अ) बोलीदारांच्या पूर्व पात्रतेसाठी पात्रता निकषाची चेकलिस्ट**

| अ.क्र. | निकष | जोडावयाची कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | निविदाकार सुवर्णकाराच्या व्यवसायाची नोंदनी भारतीय दुकान व संस्था अधिनियम १९४८ अन्वये किंवा संस्था नोंदनी प्रमाणपत्र अधिनियम १९५० प्रमाणे प्रमाणित असावे आणि ती ३१ मार्च २०२४ पर्यत किमान ३ वर्ष अस्तित्वात असावी | नेदणी प्रमाणपत्राची प्रमाणित पत्र |
| २ | निविदाकार सेस्थेची सरासरी वार्षिक उलाढाल संदर्भिय कार्याकरिता गेल्या ३ वर्षात ५० लाख असावी | १) सनदी लेखापाल (CA) प्रमाणपत्र आवश्यक<br>२) नफा तोटा पत्रक व मागील ३ वर्षाच्या कामकाजाचे लेखा परिक्षण सहित ताळेबंद सादर करावे<br>३) GST Portal चे Turn over ची Screen shot प्रत पुरविण्यात यावी. |
| ३ | सदस्यता | GJC (All India GEM and Jewellery Domestic Council) अथवा IBJA India Bullion and Jewellers Association Limited) चे प्रमाणपत्र |
| ४ | सुवर्णकार व्यवसायाचे प्रमाणपत्र | प्रत्येक शाखेचे गुमास्ता प्रमाणपत्र सादर करावे |

**ब) तांत्रिक/आर्थिक बोलीचे मुल्यमापन**

| अ.क्र. | | एकुण गुणांक | संस्थेला प्राप्त गुण |
|---|---|---|---|
| १ | निविदा संस्थेची व्यवसाय नोंदनी अस्थित्वात आल्याची आयु (प्रती १० वर्ष २ गुणांक) | १० | |
| २ | GJC (All India GEM and Jewellery Domestic Council) IBJA India Bullion and Jewellers Association Limited) चे प्रमाणपत्र (प्रत्येक सेस्थेचे सदस्यास ५ गुणांक) | १० | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | **व्यवसायाची वार्षिक उलाढाल**<br>५० लक्षा पर्यत २ गुणांक<br>५१ लक्ष ते ५ कोटी पर्यत ४ गुणांक<br>५ काटी ते ५० कोटी पर्यत ६ गुणांक<br>५० कोटी ते १०० कोटी पर्यत ८ गुणांक<br>१०० कोटीच्या वर १० गुणांक | १० | |
| ४ | संस्थेच्या/व्यवसायाच्या प्रत्येक शाखेस २ गुणांक | १० | |
| ५ | लघुत्तम दरास १० गुणांक (L-1 10 गुणांक, L-2 5 गुणांक व L-3 2 गुणांक) | १० | |

**उपरोक्त गुणांक तक्त्यानुसार ज्या सार्थास जास्तीत जास्त गुणांक प्राप्त होतील त्या सार्थाचा कायदिश देण्यास प्राधान्याने विचार करण्यात येईल.**

४. तांत्रीक बीड परिपुर्ण असल्याशिवाय व्यवसायीक बीड उघडण्यात येणार नाही.

५. निविदा दिनांक १०/१२/२०२४ वेळ २.०० पर्यत अधिक्षक (व्यय) वित्त व लेखा विभाग, जमनालाल बजाज, महात्मा ज्योतीबा फुले शैक्षणिक परिसर, अमरावती रोड, नागपूर यांचेकडे सादर करण्यात यावे.

६. निविदा दिनांक १०/१२/२०२४ **ला दुपारी ३.०० वाजता** मा. वित्त व लेखा अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समिती समक्ष नविदा धारक असल्यास त्यांचे समोर उघडण्यात येतील. परंतु काही कारणास्तव उपरनिर्दीष्ट अधिकारी उपलब्ध नसल्यास त्यांच्या सोईनुसार पुर्वसूचना न देता उघडण्यात येऊ शकतील.

७. अंदाजे रू. ११,००,०००/- पर्यतच्य किंमतीची अंदाजे २०० सुवर्ण पदके व अंदाजे १० रौप्य पदके (दर सुचीनुसार) तयार करून घ्यावयाची आहेत. **सुवर्ण पदकात सोने आणि चांदी तसेच रौप्य पदकात चांदी किती राहिल हे निश्चीत केलें आहे.** पुरवठादारांनी सुवर्ण व रौप्य पदके तयार करण्यासाठी येणारा संपुर्ण खर्च (G.S.T. वगळुन) जसे मजुरी व इतर खर्च दर्शवुन याची माहिती सोबत जोडलेंल्या विवरण पत्रात नमुद करावयाची आहे. जे पुरवठादार कमीत कमी खर्च (प्रती नग) दर्शवतील त्यांची पदके तयार करण्यासाठी निवड करण्यात येईल.

८. वरील सुवर्ण व रौप्य पदकांवर पदकाच्या एका बाजुला विद्यापीठाचे सील व नांव आणि दुस—या बाजुला **मध्यभागी ०.२०० ग्रॅम सोण्याचा पत्रा लावून पदकाला सोण्याचे पॉलीस करायचे आहे** व त्याच बाजूला पदकाचे नाव विद्यार्थ्याचे नाव, परिक्षा, विषय आणि वर्ष इत्यादी कोरणे आवश्यक आहे.

९. सुवर्ण व रौप्य पदकाचा आकार वर्तुळाकार असून पदकाचा व्यास १.५ इंच राहील. पदकांस रिबन लावण्यास कडी असणे आवश्यक आहे.

१०. सुवर्ण व रौप्य पदकांत कोणत्याही प्रकारची खराबी अथवा त्रूटी आढळल्यास पुरवठादारास दुरूस्ती करून देणे अथवा ठरलेल्या किंमतीत दुसरे पदक तयार करूण देणे बंधनकारक राहील

११. आदेशाच्या दिनांकापासुन ०५ दिवसाचे आत संपुर्ण पदके विद्यापीठास हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.

१२. विद्यापीठाने दिलेल्या सुवर्ण व रौप्य पदकांच्या यादिनुसार तेवढयाच प्रमाणात प्लॅस्टीक डबी विद्यापीठाचे सील व नांवासह पदकांसोबत पुरविणे बंधनकारक राहील.

१३ सोने व चांदीचा दर ज्या दिवशी पुरवठा आदेश देण्यात येईल त्या दिवशीच्या भारत सरकारच्या वित विभाग व भारतीय रिझर्व बॅक व्दारे घेण्यात येते ती कंपनी IBJA (India Bullion and Jewellers Association Limited) GJC (All India GEM and Jewellery Domestic Council) चे दर विचारात घेण्यात येतील.

१४. दर करारात नमुद केलेले दर (G.S.T. वगळुन) — विक्रीकर, जकात ,बांधणी खर्च, वाहतूक इ. खर्चासह **FOR** विघापीठाच्या लेखा शाखेत अथवा त्यांनी सूचविलेल्या ठिकाणी पोहचविण्यासाठी असेल.

१५. प्राप्त निविदापैकी कोणतीही निविदा पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे. याबाबत कोणत्याही प्रकारची कारणे अथवा स्पष्टीकरण देणे विद्यापीठास बंधनकारक नाही.

१६. मान्य दराचा कालावधी ११२ व्या दीक्षांत समारंभापुरता मर्यादीत राहील.

१७. दर मंजूर होणाऱ्या सार्थाने ३ दिवसांचे आत रु. १००/— च्या स्टॅप पेपरवर दोन साक्षीदारांच्या समक्ष लेखी करारनामा लिहून देणे आवश्यक आहे. तसे न केल्यास व्दितीय क्रमांकाच्या सार्थाला दर कराराचा अधिकार प्राप्त होईल. प्रथम क्रमांकाच्या सार्थाची अनामत/सुरक्षा रक्कम जप्त करणे किंवा दंड आकारण्याचा अधिकार विद्यापीठाला आहे.

१८. निविदा प्रपत्रात नमूद करण्यात आलेली संख्या अंदाजीत असून प्रत्यक्ष मागणीमध्ये घट किंवा वाढ करण्याचे तसेच निविदेत दर्शविलेल्या काही अनावश्यक पदकांबाबतची मागणी रद्द करण्याचे अधिकार विद्यापीठाने सुरक्षित ठेवले आहे.

१९. निविदा प्रपत्रा सोबत जोडलेल्या नमून्यामध्ये मान्य केलेल्या नमून्यानुसारच पुरवठा करावा लागेल. पुरवठा निकृष्ट दर्जाचा आढळल्यास त्याचे शोधन करण्यात येणार नाही. पुरवठयासोबत पोच पावती **(DM)** पाठविणे आवश्यक आहे.

२०. कार्यालयीन आदेशानुसार मुदतीच्या आत पुरवठा न केल्यास संबंधीत सार्थाची अनामत/सुरक्षा रकमेतून अथवा इतर देय असलेल्या / सुरक्षा रक्कम पूर्णपणे जप्त करणे / विलंबा बाबत दंड आकारणे हे सर्वस्वी विद्यापीठावर अवलंबून असून ते पुरवठाधारकास बंधनकारक राहील.

२१. योग्य स्थितीत पुरवठा केलेल्या पदकांची देयके तीन प्रतीत सादर करावे लागेल. तसेच रु ५०००/— किंवा त्यापेक्षा जास्त रकमेच्या देयकास राजस्व तिकीट (Revenue Stamp) लावावे लागेल.

२२. **पुरवठाधारकास पदकांच्या एकून रक्कमेच्या ७० टक्के आगावू देण्यात येईल तसेच पदकाच्या रक्कमेचे किंवा अनामत रक्कमेचे शोधन RTGS/NEFT मार्फत करण्यात येईल त्याकरीता राष्ट्रीयकृत बँकेचे खाते क्र., बँकेचे नाव व शाखा, MICR क्र. IFSC क्र. इत्यादी माहीतीचे पत्र सोबत जोडावे लागेल. (रद्द केलेला धनादेश व बँक पासबुकची झेरॉक्स प्रत जोडावी)**

२३. विवादीत परिस्थितीत न्यायालयीन क्षेत्र नागपूर राहील.

२४. निविदेतील कोणत्याही अटी व शर्तीत सवलत देता येणार नाही.

२५. निविदेतील पात्र पुरवठाधारकाला स्वतः पदकांची निर्मीती करून विद्यापीठाला पुरवठा करावा लागेल कोणत्याही इतर पुरवठाधारकाकडून ही पदके निर्मीत करून पुरवठा करता येणार नाही.

२६. हयाउपर कोणतीही अडचण उद्‌भवल्यास त्याबाबत अंतिम निर्णय देण्याचा अधिकार मा. कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांना राहील.

२७. प्रत्येक सुवर्ण व रौप्य पदकात किती सोने व चांदी वापरली आहे त्याचे मुल्य प्रमाणपत्र स्वाक्षरी करून द्यावे लागेल. **त्यात आपणाला कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.**

उपरोक्त अटी व शर्ती मी काळजीपूर्वक वाचले असून समजून घेतले आहे. सदर सर्व अटी व शर्ती मला मान्य असून त्याचे तंतोतंत पालन करण्याची हमी देत आहो.

ठिकाण :

दिनांक : अवतरणे (Quotation) धारकाची सही व शिक्का

## दरसुची

**सुवर्ण पदके (Gold Medals) व रौप्य पदक (Silver Medals)**

| अ क्र | विवरण | आकार (व्यास) | पदकांत वापरण्यात येणारी **चांदी** ☆ | पदकांत वापरण्यात **सोने** (प्रती नग) ( ग्रॅम ) (२४ कॅरेट) ☆ | पदक तयार करण्यासाठी येणारा संपुर्ण खर्च (प्रती नग) (Making Charges) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सुवर्ण पदक | १.५ इंच | २० ग्रॅम **शुध्द चांदी** | ०.२०० ग्रॅम (**२४** कॅरेट) | |
| २ | रौप्य पदक | १.५ इंच | ३० ग्रॅम **शुध्द चांदी** | निरंक | |

☆ भारत सरकारच्या वित विभाग व भारतीय रिझर्व बॅंक व्दारे घेण्यात येते ती कंपनी GJC (All India GEM and Jewellery Domestic Council) IBJA India Bullion and Jewellers Association Limited) चे दर विचारात घेण्यात येतील.

☆ G. S. T. Extra As per Rule.

टिप : १) सुवर्ण पदकाच्या एका बाजूला सिल व नांव आणि दुस–या बाजुला **मध्यभागी ०.२०० ग्रॅम सोण्याचा पत्रा लावून पदकाला सोण्याचे पॉलीस करायचे आहे** व त्याच बाजूला पदकाचे नाव विद्यार्थ्याचे नाव, परिक्षा, विषय आणि वर्ष इत्यादी कोरणे आवश्यक आहे.

२) कृपया सुवर्ण व रौप्य पदकं तयार करण्यासाठी येणारा साने चांदी चे मुल्य सोडून पुर्ण खर्च (Making Charges) प्रती नग कीती राहील हे पुरवठादाराने रकाना क्र. ६ मध्ये दर्शवावे

३) पदकाची डायी विद्यापीठाकडे उपलब्ध आहे